**निशाणी क्र. ३७ वरील आदेशा अन्वये प्रतिवादी क्र. ३ नामे वसंत सखाराम पोटे यांचा उलटतपास वादी तर्फे ॲड. एस. बी. गरड यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

१. माझे इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ चे चार भाग पडलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादींचे क्षेत्र उत्तर बाजूला असून मी व इतर प्रतिवादी यांचे क्षेत्र दक्षिण बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे क्षेत्र ४ हे ९६ आर आहे परंतु, त्यापेक्षा ते कमी भरते याची मला पुर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर प्रतिवादींने एकमिलापी होवून वादींचा उत्तर बाजूने बराच बांध कोरलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बांध कोरून ब–याच क्षेत्रावर कब्जा केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुळ गट क्र. १०७ या संपूर्ण गटाची मोजणी होवून वादीचे क्षेत्र काढून देण्यास आमची हरकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**
दिनांक–१८/१२/२०२५. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**नेवासा.**